**तक्रार केस नं. ४/२०२४** **नि. सी—९**

**तक्रारदारातर्फे उलटतपास ॲड राठी**

६. अलंकार मार्केट अकोला येथे शिव एन्अरप्रायजेस नावाने माझे मागील चार वर्षापासुन दुकान आहे. ते दुकान अनिल दरियानी यांचेकडुन मी खरेदी केले होते. ते दुकान मी २८/२२/२०१२ रोजी खरेदी केल्याचे मला आठवत नाही. मी ॲन्टी करप्शन कार्यालयात मिळकतीचे सर्व कागद दिले होते. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात मिळकतीच्या कागदपत्रांवर माझे नावाची नोंद २०१६ साली करुन घेतल्याचे मला आठवत नाही. दुकानाचे बांधकाम मी केले आहे. दुकान बांधण्यापुर्वी महानगर पालिकेकडुन परवानगी घेतली होती. महानगर पालिकेच्या मिळकतीच्या कागदपत्रांवर माझे नावाची नोंद झाली नव्हती. २०२२—२०२३ पर्यंत महानगर पालिकेचा कर भरलेला नव्हता.

७. तक्रारदारास मी २०२२ पासुन ओळखतो. मी तक्रारदारास डिसेंबर २०२२ मध्ये प्रत्यक्ष भेटलो होतो. सन २०१६ मध्ये महानगर पालिकेतर्फे मिळकतीची पाहणी झाली नव्हती. त्यावेळेस माझे दुकान बंद असल्याने पाहणी करण्यासाठी आले असल्यास मला माहिती नाही. २०२१ पासुन मी दुकान वापरत आहे. दुकान ४०० स्क्वेअर फुटचे आहे. शेजारच्या दुकानास किती कर लावला जातो याची मला माहिती नाही. रु. २६,०५२/— भरले ते पाच वर्षाच्या करासाठी भरण्यात आले होते. तक्रारदारासोबत तथाकथीत व्यवहार करण्यापुर्वी तो कोणत्या प्रकारचे काम करतो याची माहिती घेतली नाही. तक्रारदाराने माझेकडुन रक्कम मागीतली त्यावेळेस इतर कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने माझेकडे कधीही रक्कमेची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने माझेकडे रु. ३०,०००/— ची मागणी केली व त्यासंबंधीची कथने खोटे आहेत.

८. महानगर पालिकेतर्फे चौकशीमध्ये साक्ष देण्यासाठी मला पत्र आले नाही. मी याकामी शपथपत्र दाखल केले त्यावेळेस महानगर पालिकेच्या वकीलांना भेटलो. शपथपत्र मी तयार केले आहे. ते माझे दुकानात तयार करण्यात आले. ते

टाईपरायटरवर प्रिंटरद्वारे तयार केले आहे. शपथपत्र तयार करण्यापुर्वी मी कोणत्याही वकीलाला भेटलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्र वकीलांनी तयार केले व नंतर मी त्यावर सही केली.

**९.** तक्रारदारास मिळकतीच्या कराची रक्कम कमी करण्याचे अधिकार आहेत का याबाबत चौकशी केली नाही. माझे दुकान प्रत्येक रविवारी बंद असते. माझे दुकानाशेजारी अनेक दुकाने आहेत. तक्रार देण्यापुर्वी तक्रारदार मला कधी भेटला होता हे ॲन्टी करप्शन ब्युरोमध्ये मी सांगितले होते. मी ॲन्टी करप्शनकडे दिलेला जबाब याकामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदाराने माझेकडे कधीही २०,०००/— किंवा २५,०००/— ची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारदारास मिळकतीच्या कराची रक्कम दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दाखल करुन तक्रारदारास खोटया गुन्हयात अडकविले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**समक्ष,**

SATISH KACHRULAL BANGAD

Digitally signed by SATISH KACHRULAL BANGAD
Date: 2025.02.06 14:57:50 +0530

**(एस. के. बांगड)**
**न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला.**

**दिनांकः— ०५/०२/२०२५.**